# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, गडचिरोली
दिनांक ०६/०२/२०१९

## पोलीस शिपाई भरतीसाठी सुधारित सेवा प्रवेश नियम

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्वरुपात बदल झालेला असल्याने पोलीस शिपाई पदावार बुध्दीमान उमेदवारांची निवड होण्याची आवश्यकता, पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेतील शारिरीक चाचणी दरम्यान होणाऱ्या दुर्घटना याबाबी विचारात घेवून शासनाने शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, दिनांक १८/१/२०१९ व क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३८०/पोल-५अ, दिनांक १८/१/२०१९ अन्वये भरती प्रक्रियेत बदल केलेला आहे. नवीन पध्दतीमुळे पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांची लेखी परीक्षा प्रथम घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवर रिक्त होणाऱ्या पदांच्या प्रमाणात आवश्यक तेवढयाच योग्य उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी बोलविण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रिया दीर्घकाळ सुरू न राहता जलद गतीने पार पडेल. त्यामुळे भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना जास्त दिवस ताटकळत रहावे लागणार नाही. भरती प्रक्रियेत केलेल्या बदलांचा फायदा उमेदवारांना निश्चितच होईल.